# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६९ फॅक्स-२६९०००७

E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


रजिस्टर एडी / ईमेलद्वारे

क्र.१८/तंशिसं/ शु.नि.प्रा.निर्देश /२०१८/४२३
दि. १६/११/२०१८

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय : शुल्क नियामक प्राधिकरण यांचे शुल्काबाबतचे निर्देश.....**

संदर्भ : सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्र. शुनिप्रा/१०६७/२०१८ दि.३/१०/२०१८

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये महाडीबीटी पोर्टलमध्ये प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा कमी शुल्क संस्थांकडून अनावधानाने भरले गेल्यास व सदर शुल्क प्राधिकरणामार्फत मंजूर करण्यात आल्यानंतर सदर कमी शुल्क विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रुपाने मंजूर झाल्यास शुल्क नियामक प्राधिकरणाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. त्यामुळे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांना शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेले शुल्क अचुकरित्या व काळजीपूर्वक पोर्टलवर भरणाच्या सूचना देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. ( सोबत पत्राची प्रत जोडली आहे.)

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने, आपल्या अखत्यारितील सर्व संस्थांना सूचित करण्यात यावे की, "महाडीबीटी पोर्टलवर, शैक्षणिक वर्षनिहाय शुल्क भरताना कोणतीही चूक न करता अत्यंत काळजीपूर्वक व अचूकरित्या पोर्टलमध्ये भरावे. तथापि, अनावधानाने आपणाकडून कमी शुल्क पोर्टलमध्ये भरल्यामुळे विद्यार्थ्यांना कमी शुल्क मंजूर झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील. तसेच उर्वरित शुल्क विद्यार्थ्यांकडून वसूल करता येणार नाही. तसे केल्यास संबंधित संस्थेवर कारवाई करण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी."

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

६७१8 27/11/2018

प्रत - कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २, २अ, ३,१० मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहीतीसाठी.



पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/२०१८/2827
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती
दिनांक 03 DEC 2018

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१)प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/ विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था अमरावती विभाग अमरावती यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.